Date:......................

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,

# महात्मा गांधी विद्यालय, खानापूर
## तालुका - हवेली, जिल्हा - पुणे.

## * सखी - सावित्री समिती *

सन 2023 - 2024

| क्र. | पदनाम | सदस्यांचे नाव | पद. |
|---|---|---|---|
| 1. | शाळा व्यवस्थापन समिती | मा. रघुनाथ रोणका यादव | अध्यक्ष |
| 2. | शाळेतील महिला शिक्षक प्रतिनिधी | श्रीम. नुतन अभिजीत ओतूरकर | सदस्य |
| 3. | समुपदेशक | श्री. श्रीकांत आत्माराम ढमाळ | सदस्य |
| 4. | वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ महिला प्रतिनिधी | डॉ. वर्षाराणी मुंडासे | सदस्य |
| 5. | अंगणवाडी सेविका | श्रीम. संगिता जवाहर सपकाळ | सदस्य |
| 6. | पोलीस पाटील | मा. श्री. गणेश सपकाळ | सदस्य |
| 7. | ग्रामपंचायत सदस्य (महिला) | मा. श्रीम. शिल्पा सुधाकर गायकवाड (सरपंच) | सदस्य |
| 8. | पालक (महिला सदस्य) | मा. श्रीम. रुपाली निलेश जाधव | सदस्य |
| 9. | शाळेतील विद्यार्थिनी | कु. अस्मिता विकास जावळकर | सदस्य |

MON TUE WED THU FRI SAT SUN

Date:....................

| क्र. | पदनाम | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|---|
| | विद्यार्थी प्रतिनिधी | 1. चि. ओंकार अशोक वायाळ<br>2. चि. रुद्र गणेश वाघ. | सदस्य<br>सदस्य |
| 10. | शाळेचे मुख्याध्यापक | * मा. श्री. जाधव एस. बी. | सदस्य (सचिव) |
| | | * मा. श्री. म्हेत्रे एस. के. | सदस्य (सचिव) |
| | | | |

मुख्याध्यापक
महात्मा गांधी विद्यालय,
खानापूर ता हवेली, जि. पुणे

Date:....................

MON TUE WED THU FRI SAT SUN

# -: शासन निर्णय :-

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-संकिर्ण-२०२२/प्र.क्र ३९/एसडी-४ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक : १०.०३.२०२२ मार्फत शासन आदेश निर्गमित करण्यात आला.

# -: प्रास्तविक :-

बालकांच्या मुलभूत हक्कांचे संरक्षण व्हावे याकरिता संयुक्त राष्ट्र संघाने सन १९८९मध्ये बालहक्कांसंदर्भात 'बालहक्क संहिता' स्वीकारली असून त्याद्वारे सर्व बालकांना मूलभूत मानवी हक्क मिळविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

जसे जीवितांचा अधिकार शारीरिक आणि बौद्धिक सुप्त गुणांचा विकास करण्याचा अधिकार, बालकांच्या विकासावर घातक परिणाम होईल अशा प्रभावापासून संरक्षणाचा अधिकार तसेच कौटुंबिक, सांस्कृतिक व सामाजिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार.

बालकांचे हक्क हे विशेष मानवी हक्क आहेत. जे १८ वर्षांखालील सर्व मुला-मुलींना लागु आहेत. जात धर्म वंश, लिंग, रंग, भाषा आणि संपत्ती इत्यादींचा विचार न करता सर्व बालकांना हक्क मिळवून देणे हे बालहक्क संहितेनुसार क्रमप्राप्त आहे.

महाराष्ट्रात बालकांच्या हक्कांचे संरक्षण प्रचलित

Date:..................... MON TUE WED THU FRI SAT SUN

बालहक्क संरक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

बालहक्क संरक्षण कायद्यानुसार सर्व बालकांच्या हिताचे / हक्काचे रक्षण करणे अभिप्रेत आहे. सद्यस्थितीत मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षिततेबाबत प्राधान्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज जाणवत आहे. कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर मुला-मुलींच्या शिक्षणावर दूरगामी परिणाम झालेले दिसत आहेत. पालकांच्या स्थलांतरणामुळे शालाबाह्य मुला-मुलींचे प्रमाण वाढण्याची भिती आहे. तसेच बालविवाहांचे प्रमाण पण चिंताजनक आहे. घर शाळा आणि समाजात मुला-मुलींना सुरक्षित व बालस्नेही वातावरण मिळावे, हे तसेच त्यांचे सामाजिक, भावनिक, अध्ययन उत्तमरित्या व्हावे यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२५ व्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने विविध स्तरावर समित्या गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

मुख्याध्यापक
महात्मा गांधी विद्यालय,
थेऊर/खानापूर ता हवेली, जि.पुणे

Date:....................

MON TUE WED THU FRI SAT SUN

# शाळास्तर सखी-सावित्री समितीची कार्ये

1. आपल्या कार्यक्षेत्रातील 100% मुलामुलींची (दिव्यांग विद्यार्थी) पटनोंदणी व 100% उपस्थिती साध्य करण्यासाठी गावातील प्रत्येक घरी शिक्षकांनी/बालरक्षकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांची नावनोंदणी करणे.

2. स्थलांतरीत पालकांच्या व शाळाबाहेर असलेल्या सर्व मुला-मुलींना सर्वेक्षणाच्या माध्यमातून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल करणे.

3. विद्यार्थ्यांच्या भावनिक शारिरीक व बौद्धिक विकासासाठी तसेच ताणतणाव मुक्तीसाठी मुला-मुलींचे व त्यांच्या पालकांचे समुपदेशन करणे. सजग पालकत्वासाठी कार्यशाळा आयोजीत करणे.

4. मुला-मुलींच्या शिक्षणासाठीच्या असणाऱ्या शासकीय योजनांची माहिती देऊन प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यवाही करणे.

5. मुला-मुलींना करिअर संबंधी मार्गदर्शन करणे. कौशल्य-विकसनासाठी विविध उपक्रम राबविणे. मुलींच्या स्वसंरक्षणासाठी स्वतंत्र्य प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करणे.

6. मुला मुलींसोबत आरोग्यदायी सवयींसाठी संवाद साधणे आणि निरोगी जीवनासाठी स्थानिक डॉक्टरांच्या सहकार्याने आरोग्य शिबिर, समुपदेशन [illegible] विविध उपक्रमांचे आयोजन करणे

Date:.................... MON TUE WED THU FRI SAT SUN

बालविवाहाचे होणारे दुष्परिणाम व बालविवाहाविषयी विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये जनजागृती निर्माण करणे व मुलांचे शिक्षण सुरू राहण्यासाठी प्रयत्न करणे.

8. व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (CSR) च्या माध्यमातून सामाजिक, भौगोलिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी मदत करणे.

9. विविध कारणांमुळे मुला-मुलींच्या होणारा अध्ययन ऱ्हास कमी करण्यासाठी उपाययोजना करणे.

10. शाळेत समतामूलक वातावरण राहील यासाठी लिंगभेदविरहीत व समावेशक उपक्रम राबवणे. विद्यार्थी-विद्यार्थीनी कोणत्याही अत्याचाराला बळी पडणार नाहीत अशी निकोप वातावरण निर्मिती करणे. अपवादात्मक परिस्थितीत असे घडल्यास तक्रार दाखलकरण्याबाबत लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा POCSO अंतर्गत असलेल्या ई-बॉक्स यात राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाने तयार केलेल्या CHIRAG या app ची माहिती व चाइल्ड हेल्पलाइन नं. (१०९८) बाबत सूचना फलक शाळेत लावले आहेत याची खात्री करणे.

11. समितीच्या महिन्यातून १ वेळा (आवश्यकता असल्यास अधिक वेळा) बैठका आयोजीत कराव्यात. सदर बैठका शाळेत घेण्यात याव्यात. जेणे करून मुलामुलींचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील.

Date:....................

MON TUE WED THU FRI SAT SUN

13. शाळास्तर समिती बैठकीचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत केंद्रस्तर समितीसमोर सादर करावा. केंद्रातील कोणत्याही स्तरावर मुलींच्या शिक्षणाबाबत व इतर समस्याबाबत निर्माण झालेल्या अडचणी केंद्रस्तर समितीमध्ये समजू शकतील व त्यावर तातडीने निर्णय घेणे शक्य होईल.

मुख्याध्यापक
महात्मा गांधी विद्यालय,
खानापूर ता. हवेली, जि. पुणे

Date:.................... सभा क्र. 1.

MON TUE WED THU FRI SAT SUN

# * सूचना *

'सखी - सावित्री समिती' सभा दि. 18/01/20
वार, शुक्रवार रोजी ठिक 10 वाजता आयोजित केली आहे. तरी सदर सभेस समिती अध्यक्ष, सदस्य व सचिव यांची उपस्थिती प्रार्थनिय आहे. या सभेमध्ये पुढील विषयावर चर्चा करण्यात येईल.

## * सभेपुढील विषय *

1. सखी - सावित्री समिती सदस्य ओळख.
2. 'सखी - सावित्री समिती' स्थापनेचा उद्देश समजावून घेणे.
3. 'सखी - सावित्री समिती'ची शालेय स्तरावरील कार्यांचे अवलोकन करणे.
4. विद्यार्थ्यांच्या भावनिक, शारिरिक व बौद्धिक विकासासाठी तसेच ताणतणाव मुक्तीसाठी मुला-मुलींचे व पालकांचे समुपदेशन करणे.
5. मुला-मुलींना आरोग्यदायी सवयींसाठी संवाद साधणे.
6. विविध कारणांमुळे मुला-मुलींच्या होणाऱ्या अध्ययन ऱ्हास कमी करण्यासाठी उपाययोजना करणे.

मुख्याध्यापक
महात्मा गांधी विद्यालय,

Date:....................

| अ.नं. | उपस्थित सदस्याचे नाव | संपर्क क्रमांक | स्वाक्षरी. |
|---|---|---|---|
| 1. | मा.सुश्री जाधव एस.बी. | 9657752665 | |
| 2. | मा.सुश्री म्हेत्रे एस.के. | 9881324377 | |
| 3. | मा.श्री. रघुनाथ बेणबा यादव | 9922682868 | [signature] |
| 4. | मा.श्री. श्रीकांत आत्माराम ढमाळ | 9765915665 | [signature] kamal |
| 5. | मा.श्री. डॉ. शिंदे | | |
| 6. | मा.श्री. गणेश सपकाळ | 8605124100 | [signature] |
| 7. | मा.श्रीमि. गायकवाड शिल्पा सुधाकर | 8830307766 | [signature] |
| 8. | मा.श्रीमि. रूपाली निलेश जाधव | | |
| 9. | मा.श्रीमि. ओतूरकर एन.ए. | 8888110764 | [signature] |
| 10. | मा.श्रीमि. गुरव जे.एच. | 9011061739 | |
| 11. | मा.श्रीमि. हिरे | 7517363494 | |
| 12. | मा.श्रीमि. भोसले | 9763908791 | |
| 13. | मा.श्रीमि. पानसरे | 9307088968 | |
| 14. | मा.श्री. मदने | 9403983745 | |
| 15. | चि. ओंकार अशोक वयाळ | | |
| 16. | चि. रूद्र गणेश वाघ. | | |
| 17. | कु. आस्मिता विकास जावळकर. | | |
| 18. | कु. रिया ज्ञानेश्वर जाधव. | | |

MON TUE WED THU FRI SAT SUN

Date:....................

दिनांक - 19/01/202

महात्मा गांधी विद्यालय खानापूर येथे सखी-सावित्री समितीची स्थापना करण्यात आली व या समितीची (मिटींग) सभा ही एक आज दिनांक 18/01/2024 रोजी सकाळी 10 वाजता विद्यालयात आयोजित करण्यात आली.

सखी-सावित्री समितीची ही पहिलीच सभा असल्यामुळे उपस्थित सर्व सदस्यांची ओळख समितीचे कार्य व आजचे विषय याविषयी शाळेतील महिला सदस्य श्रीमती ओनूरकर एन. ए. यांनी प्रथम सर्वांचे स्वागत करुन प्रास्ताविक केले.

सभेचे अध्यक्षस्थान श्री. रघुनाथ गेणबा जाधव यांनी भुषविले. विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. जाधव एस. बी. यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार केले.

सभेत समुपदेशक श्री ढमाळ सर यांनी उपस्थितांना विद्यार्थ्यांच्या भावनिक, शारिरिक व बौद्धिक विकासासाठी तसेच ताणतणाव मुक्तीसाठी मुला-मुलींचे व पालकांचे समुपदेशन केले. खानापूर आरोग्य केंद्राचे डॉ. श्री. शिंदे यांनी विद्यार्थीनींसाठी सॅनटरी पॅडच्या वापराविषयी व आरोग्यदायी सवयींविषयी मार्गदर्शन केले.

विद्यालयाचे विद्यमान प्राचार्य यांचा रुजू दिनही आजच असल्याने प्राचार्य श्री मेहेत्रे सर यांचेही स्वागत प्रभारी प्राचार्य श्री जाधव एस. बी. यांनी केले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन ज्येष्ठ शिक्षक श्री मदने सर यांनी केले.